# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. १६ जुलै,२०२१

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१६(प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन व अध्ययन व विस्तार विभाग व योग मार्गदर्शन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.१९ जुलै रोजी विद्यापीठाच्या अधिसभागृहात महिलांसाठी आरोग्य विषयक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.१९ जुलै रोजी दुपारी २ वाजता विद्यापीठाच्या अधिसभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.बी.व्ही.पवार राहतील. कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ.एस.आर.भादलीकर, व्य.प.सदस्य प्रा.डॉ.रत्नमाला बेंद्रे यांची उपस्थिती राहणार आहे. विद्यापीठात विविध कामांसाठी कंत्राटी, दैनिक वेतनिक महिला वर्ग कार्यरत असून त्यामध्ये उद्यान विभाग, साफसफाई, कुशल, अकुशल, सुरक्षा रक्षक व परीक्षा विभागात महिला वर्ग मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. या महिलांसाठी महिलांचे आरोग्य, ताणतणाव व योग, त्यांची शारिरीक क्षमता, पारिवारीक समस्या, शिक्षण व त्यांची मानसिकता अशा विविध विषयांवर योग मार्गदर्शन केंद्राच्या सहा.प्राध्यापक डॉ.लिना चौधरी व वैद्यकिय अधिकारी डॉ.अर्चना सांगळे ह्या मार्गदर्शन करणार असून महिलांशी थेट चर्चा करणार आहेत. अशी माहिती आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रा.डॉ. मनिष जोशी व योग मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख इंजि.आर.आय.पाटील यांनी कळविले आहे. प्रभारी कुलगुरू प्रा.ई. वायुनंदन यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी